**Development Support Team (DST)**

Pooja Heritage, Flat No. 2, Lane No. 3,
Anand Park, Aundh, Pune 411067.
Phone : 020-25887524; +917709041376.

---

कृपया प्रसिद्धीसाठी :

## “डेव्हलपमेंट सपोर्ट टीम” तर्फे उन्हाळी शिबिरांचे यशस्वी आयोजन

पुण्याच्या जुनी सांगवी आणि दापोडी परिसरातील गरीब वस्त्यांमधील ८ ते १४ वयोगटातील मुलामुलींना मोबाईलच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी “डेव्हलपमेंट सपोर्ट टीम” (डीएसटी) या राज्यातील प्रसिद्ध स्वयंसेवी संस्थेच्या वतीने, दि. १३ ते १५ आणि २० ते २२ मे २०२६ दरम्यान दोन विशेष उन्हाळी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. जुन्या सांगवीतील तानाजीराव शितोळे उद्यान येथे संपन्न झालेल्या शिबिरात ५५; तर दापोडी येथील सिद्धार्थनगरमधील सांस्कृतिक भवनात झालेल्या शिबिरामध्ये ४२ मुलंमुली सहभागी झाले. बालवयातच विविध कलागुण विकसित व्हावे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वांचा सर्वांगीण विकास व्हावा याहेतूने, सुप्रसिद्ध बालसाहित्यकार व कथाकथनकार श्री. एकनाथ आव्हाड (कथाकथन, कोडी आणि गाणी); उन्नती गोखले (ओरिगामी या कलेतून टाकाऊ कागदापासून वस्तू, आकार, प्राणी बनविण्याचे प्रशिक्षण); रश्मी घाटगे (योगासने व व्यायामाचे विविध प्रकारातून चांगले आरोग्य आणि एकाग्रते वाढविणे); संवेदनशील चित्रकार आभा भागवत (चित्रकलेच्या रेषांमधून रंग, आकार आणि अभिव्यक्तीचा विकास); “रेस्क्यू” संस्थेचे श्री. नचिकेत उत्पाद (सृष्टीतील वन्यजीव,पक्षी आणि वनस्पतींशी नाते जोडणे), आदी मान्यवर तज्ञांनी वरील विषय तसेच, लेखनकौशल्य विकसित करण्याबाबतही शिबिरार्थींना मार्गदर्शन करून बालकांचा आनंद द्विगुणित केला. वरील शिबिरांच्या मुख्य संयोजक आणि “डीएसटी”च्या विश्वस्त सचिव मेधा रानडे, संस्थेच्या प्रकल्प समन्वयक दीपाली क्षीरसागर आणि सामुदायिक आरोग्यक्षेत्रातील तज्ञ व संस्थेचे विश्वस्त लेफ्टनंट कर्नल डॉ. अनिल परांजपे यांनी देखील बालकांशी वेळोवेळी संवाद साधला तसेच, या संपूर्ण उपक्रमाची आखणी करून ती यशस्वी करण्यात विशेष परिश्रम घेतले. या प्रकारची शिबिरे दिवाळीच्या सुट्टीतही आयोजित करण्याची पालकांनी “डीएसटी” संस्थेला आवाहन केले.

---

दि. २४ मे २०२६

शिरीष कुलकर्णी

अध्यक्ष, डेव्हलपमेंट सपोर्ट टीम

**Development Support Team (DST)**
Pooja Heritage, Flat No. 2, Lane No. 3,
Anand Park, Aundh, Pune 411067.
Phone : 020-25887524; +917709041376.

---

Press Note :

# DST held Summer Camps for underprivileged children

**Pune :** To steer children away from mobile addiction, the "Development Support Team" (DST), a well-known NGO, successfully organized two special summer camps from May 13 to 15 and May 20 to 22, 2026 specially for boys and girls aged 8 to 14 from underprivileged localities in the Old Sangvi and Dapodi areas of Pune. 55 children participated in the camp held at Tanajirao Shitole Garden in Old Sangvi, while 42 children attended the camp organized at the Cultural Hall in Siddharthnagar, Dapodi.

With the primary objective of nurturing multi-talents at a young age including the writing skills and fostering holistic personality development, several renowned experts guided the campers and doubled their joy across a variety of subjects, as per the followings :

**Eknath Awhad** (a known writer for children's literature): Storytelling, riddles & fun songs); **Unnati Gokhale** (origami training, teaching children to create objects, shapes, and animals from waste paper); **Rashmi Ghatge** (yoga and various physical exercises aimed at promoting good health and improving ability to concentrate); **Abha Bhagwat** (Sensitive artist/painter, developing an understanding of colors, shapes, and self-expression through the lines of drawing); and **Mr. Nachiket Utpat** (from the organization 'Rescue'): Connecting and building a bond with wildlife, birds, and plants in nature).

**Mrs. Medha Ranade**, the chief organizer of the camps and Trustee-Secretary of "DST"; **Deepali Kshirsagar**, Project Coordinator; and **Lt. Col. Dr. Anil Paranjpe**, a community health expert and Trustee of the organization, interacted with the children throughout the event. They also played a pivotal role in planning and successfully executing this entire initiative. Impressed by the impact of this activity, parents have urged "DST" to organize similar camps during the upcoming Diwali vacations as well.

---

May 24, 2026

Shirish Kulkarni
Chairman, Development Support Team